# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/मार्च २०२५/१००
दिनांक-१९/०६/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/क.महाविद्यालय
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय:- इ.१० वी व इ.१२ वी परीक्षेस शाळा/क.महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगीरित्याअध्ययन करुन स्वत:च्या जबाबदारीवर विद्यार्थ्यास प्रविष्ठ होण्याची परवानगी देण्याबाबतच्या सध्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत.**

**संदर्भ:- १. राज्यमंडळ कार्यकारी परिषद ठराव क्र.०९ दि.०१/११/२०२३**
**२. राज्यमंडळाचे पत्र जा.क्र.रा.मं./परीक्षा-३/१५३२ दि.१८/०४/२०२४ चे पत्र**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की इ. १० वी व इ.१२ वी परीक्षेस शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगीरित्या अध्ययन करुन स्वत:च्या जबाबदारीवर विद्यार्थ्यास प्रविष्ठ होण्याची परवानगी देण्याबाबतच्या सध्याच्या धोरणात सुधारणा करणेच्या अनुषंगाने ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विषय अध्यपनाची सोय नाही, अशा विषयांना खाजगीरित्या अध्ययन करण्याबाबतचा विषय दि.०१/११/२०२३ रोजीच्या कार्यकारी परिषद मध्ये सादर केला असता खालील शिफारशीनुसार खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

१. सद्यस्थितीत दि.०१/१०/१९९४ व दिनांक ३०/०१/२००६ रोजीच्या राज्यमंडळ कार्यकारी परिषदेच्या ठरावानुसार प्रचलित पध्दतीने कार्यवाही सुरु आहे, ती कायम ठेवण्यात येत आहे.
२. माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी स्वयंअध्ययन विषय निवडताना चुकीचे विषयांचे संयुक्तीकरण (Wrong Combination) होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
३. सदर विषयाची तोंडी, प्रात्यक्षिक व अंतर्गत मुल्यमापनाची जबाबदारी संबंधित माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाची असल्याने तसे हमीपत्र प्रस्तावासोबतच सादर करण्यात यावे.
४. सदर विषयांना परवानगी घेण्यासाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयानी त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ ऑगस्टपूर्वी प्रस्ताव पाठवून विभागीय मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
५. सदर प्रस्तावासोबत प्रति विद्यार्थी रक्कम रु.२,०००/- इतके शुल्क जमा करणे आवश्यक आहे.

त्यानुसार फेब्रुवारी- मार्च २०२५ परीक्षेपासून उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व सदर बाब आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांच्या संबंधित विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव
① शिक्षण उपसंचालक कोल्हापूर
② शिक्षणाधिकारी (माध्य) कोल्हापूर | सांगली | सातारा